बीड । सोमवार
१४.०४.२०२५
वर्षे : ५ अंक : १४
किंमत : ३ रू. पाने : ४

दैनिक ● www.marathwadapatra.com

# मराठवाडा पत्र

■ संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे ■




dailymarathwadapatra2021@gmail.com RNI:Reg.NO.MAH/MAR/2021/80074 Post:Reg.No.L/226/RNP/Renewal/2025-2027 Mob:9822152955 

# अरबाजच्या सप्तरंगात संघर्षाचा आगाज

## मुस्लिम नेतृत्वाला सहावे फर्ज म्हणून जपा : भागवत तावरे

### मस्जिद वरचे हल्ले खपवून घेणार नाही

### बालकांना शिक्षण युवकांना रोजगार महिलांचे सबली करण आणि हक्कासाठी राजकारण तुडुंब सभागृहात पहिल्या मेळाव्यातला ठराव



**● कोण आहे अरबाज पठाण**

अगदी महिन्यात जिल्ह्यात मुस्लिमयुवकांची मोट बांधणारा अरबाज पठाण हे मानूर येथील असून ते दिल्ली मुंबई मधील राजकीय परीघात काम करतात खासदार लंके यांच्या यंत्रनेत दिल्ली समजलेले अरबाज आतां गल्लीतल्या बांधवाना एकत्र करत आहेत. मुस्लिमांना हक्काच विचारपीठ मुस्लिम युवकांना विकासाची रोजगाराची दिशा, मुस्लिम गरीब कुटुंबातील मुलांना दर्जेदार शिक्षणाची आशा दाखवणारे अरबाज पठाण अगदी जमिनीवरचे मातीतले कार्यकर्ते असून त्यांच्या या भूमिकेने मुस्लिम युवकांना उम्मीदकार मिळाला आहे.

**● लोकपत्रकारांच्या भाषणात दाह वेदना आणि एल्गार**

भागवत तावरे आणि मुस्लिमांच्या वेदनेचे एक नाते राहिलेले आहे अरबाज पठाण यांच्या लढ्याला अनुमोदन देताना लोकपत्रकार व्यवंस्थेवर बरसले, केवळ मुस्लिमांना वगळने टाळणे खिजवणे आणि संशयाच्या कटघेऱ्यात घेणे आता सहन करू नका असे म्हणतात भागवत तावरे यांनी उर्दू हिंदीत युवकांमध्ये ऊर्जा भरली. लोकशाहीचा लढा कसा लढायचा अन कसा जिंकायचा याची आखनी करताना लेखणीच्या वारसदाराने युवकांचा स्वाभिमान जागवला. यावेळी युवकांच्या डोळ्यात आसू आणि आशा दिसल्या लढण्याची प्रेरणा शब्दबद्ध करताना भागवत तावरे यांनी सत्तेच्या डोळ्यात झणझणीत अंजन भरले.



**बीड । प्रतिनिधी**

विशाळगड पासून ते अर्धमसला मस्जिद वरील आतंकवादी हल्ला, मुस्लिमांच्या आस्था आणि अस्मिता यांना नथांबता दुखावणे असेल, मुस्लिम समाजात बेरोजगारी, शिक्षणाची निकडं, सामाजिक असुरक्षिता आरोग्य आणि राजकारण अश्या सर्वकस मुद्याना घेऊन शेख अरबाज यांनी सप्तरंग संघटनेची स्थापना केली असून जिल्ह्यातून युवकांना जोडून आज बीड मध्ये भव्य मेळावा घेतला. मुस्लिमांच्या सहनशक्तीचा अंत न पाहू नये नाहीतर सविधान सर्वांना सारखे आहे म्हणत जशास तसे उत्तर देऊ असा इशारा हजारो युवकांना घेऊन अरबाज यांनी दिला यावेळी मुस्लिम युवकांनी एकमुखी त्यांच्या सामाजिक राजकीय भूमिकेशी एकरूप राहू असे म्हटले.

बीड येथील हॉटेल अनविता येथील हॉल खचाखच भरलेल्या उत्साहात सप्तरंग संघटनेचा पहिला ऐतिहासिक मेळावा पार पडला यावेळी संस्थापक अध्यक्ष अरबाज पठाण मुस्लिमांच्या वेदना उपेक्षा आणि अपेक्षा बोलून दाखवल्या व याच साठी रचनात्मक कृती कार्यक्रम घेऊन मोठा दबाव गट म्हणून काम करणार असल्याचे म्हटले. यावेळी बीड जिल्ह्यातील प्रत्येक तालुक्यातून सप्तरंग चे पदाधिकारी पोहचले होते. मुस्लिम समाजातील गरिबांसासाठी विविध उपक्रम व कार्यक्रम हातात घेऊन आपण हक्क आधार व मदत घेऊन सामाजिक कर्तव्य पार पाडणार असल्याचे अरबाज पठाण यांनी म्हटले. यावेळी शेख शफिक भाऊ, नगर सेवक अमर शेख सहित आदी मान्यवर होते. ▶▶ उर्वरित पान २ वर

# जिल्हा रुग्णालयातील कर्मचाऱ्यांच्या हलगर्जीपणामुळे प्रस्तुती नंतर महिलेचा मृत्यू; दोषीवर तात्काळ कारवाई करावी

**● मनसे महिला राज्य उपाध्यक्ष वर्षा जगदाळे यांची मागणी**



**बीड । प्रतिनिधी**

जिल्हा रुग्णालयाचा कारभार ढासळला असून नॉर्मल डिलिव्हरी झाल्यानंतरही अति रक्तस्त्रावामुळे बाळंतीण महिलेचा दुर्देवी मृत्यू झाल्याची घटना जिल्हा रुग्णालयात घडली आहे. या प्रकरणात जे कर्मचारी डॉक्टर दोषी असतील त्यांच्यावर तात्काळ कारवाई करण्याची मागणी महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या महिला राज्य उपाध्यक्ष वर्षा जगदाळे यांनी केली आहे. छाया गणेश पांचाळ (वय २१) रा.आंबील वडगाव येथील रहिवासी असून जिल्हा रुग्णालयात त्यांना प्रसूतीसाठी दाखल करण्यात आले होते. प्रस्तुतीही सामान्य झाली मात्र रात्री अचानक रक्तस्त्राव सुरू झाला याची माहिती वार्डमधील नर्स यांना देण्यात आली मात्र याकडे त्यांनी साफ दुर्लक्ष करत उलट उद्धटपणाची भाषा वापरली. रात्रभर छाया पांचाळ यांना रक्तस्त्राव झाल्याने सकाळी त्यांची प्राणज्योत मावळली. नॉर्मल डिलिव्हरी होऊनही महिलेचा मृत्यू डॉक्टरांच्या व संबंधित स्टाफच्या ▶▶ उर्वरित पान २ वर

# सुरेश धस, संदीप क्षीरसागरांकडून शिक्षक बदली प्रक्रियेत ३९ कोटींचा घोटाळा; ओबीसी नेत्याचा गंभीर आरोप

**बीड । प्रतिनिधी**

बीड जिल्ह्यात २०१४ साली जिल्हा परिषद शिक्षक आंतर जिल्हा बदली मध्ये तत्कालीन मंत्री सुरेश धस (डीशीह उ्हरी), जिल्हा परिषद अध्यक्ष सय्यद अब्दुल्ला, जिल्हा परिषद शिक्षण सभापती संदीप क्षीरसागर यांनी तब्बल ३९ कोटी रुपयांचा घोटाळा केल्याचा आरोप ओबीसी नेते बाळासाहेब सानप यांनी केला. बीडमध्ये आयोजित पत्रकार परिषदेत ते बोलत होते.




बीड मधील बिंदू नामावलीच्या घोटाळ्यासंदर्भात सुरेश धस यांनी तक्रार केल्यानंतर हा मुद्दा ऐरणीवर आला आहे.

बाळासाहेब सानप म्हणाले की, १४ वर्षानंतर बीड जिल्हा परिषदेत बिंदू नामावली प्रश्न उद्भवला आहे. ज्यावेळी आंतरजिल्हा बदल्या सुरू होत्या, त्या काळात २०१४ साली सर्व शिक्षकांनी मागणी केली होती की, बीड जिल्ह्यामध्ये आम्हाला परत यायचे आहे. त्यावेळी राज्याचे मंत्री सुरेश धस होते. जिल्हा परिषद अध्यक्ष सय्यद अब्दुल्ला आणि ▶▶ उर्वरित पान २ वर




















# डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची पत्रकारिता...

बाबासाहेब आंबेडकर यांची ओळख घटनाकार, कायदेपंडित, अर्थतज्ञ अशी आहे. परंतु पत्रकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणून अद्यापही त्यांची तेवढी दखल घेतली गेली नाही. आंबेडकरांनी पत्रकारिता पोटभरू किंवा प्रचारकी म्हणून केली नाही तर समाजोद्धार हाच त्यांचा मुख्य हेतू होता. राष्ट्रोद्धाराचे मूलभूत अधिष्ठान त्यांना लाभलेले होते. या बाबीकडे या क्षेत्रातील तज्ञांनी जाणीवपूर्वक कानाडोळा केला.डॉ. बाबासाहेबांनी मूकनायक, बहिष्कृत भारत, प्रबुद्ध भारत या नावांनी पाक्षिके चालवली. त्यापैकी जनता आणि प्रबुध्द भारत ही त्यांच्या चळवळीची मुखपत्रे असली तरी त्यांचे संपादन त्यांनी स्वतः न करता सहकार्यांकडून करून घेतले. मूकनायक, बहिष्कृत भारत या दोन्ही पत्रांचे संपादन मात्र त्यांनी स्वत:च केले. संपादन क्षेत्रांमध्ये ते स्वतः प्रत्येक ओळ आणि ओळीकडे लक्ष देत असत. कारण बहिष्कृत भारतच्या संपादकास मदत करणारा दुय्यम संपादक ठेवण्याइतकी पत्राची सांपत्तिक स्थिती नव्हती. बिन मोली संपादकीय काम करण्यास स्वार्थ त्यागी दलितातील कोणी मनुष्य त्यांना एकही लाभला नाही. सार्वजनिक कार्याविषयी कळकळ वाटली नसल्यामुळे लोकांचा म्हणावा तितका पाठिंबा त्यांना मिळाला नाही. त्यामुळे त्यांना सर्व काम करावे लागले.बाबासाहेबांची पत्रकारिता सखोल जाणून घेण्यासाठी मूकनायक आणि बहिष्कृत भारत ही पत्रे आधारभूत आहेत. त्यातून त्यांच्या पत्रकारितेचे समग्र दर्शन घडते.

काय करूं आता धरूनिया भीड । नि:शंक हे तोंड वाजविले ।
नव्हे जगीं कोणी मुकीयांचा जाण । सार्थक लाजून नव्हें हित ।

मूकनायकच्या सुरुवातीलाच बाबासाहेबांनी लिहिलेल्या ओळीतून त्यांची भूमिका स्पष्ट होते.त्याने त्यावेळी खऱ्या अर्थाने समाजाला आवाज दिला. त्याकाळच्या वृत्तपत्रांचे दोन मुख्य उद्देश होते. एक म्हणजे स्वातंत्र्याच्या आंदोलनाला गती देणे आणि समाज सुधारणा करणे. बाबासाहेबांची पत्रकारिता म्हणजे मानव मुक्तीचा धगधगता अंगार होती. समाज सुधारणा बाबासाहेबांना मान्य नव्हती. एका बाजूला राजकीय स्वातंत्र्यासाठी आकाशपाताळ एक करणारे नेते माणसाला माणसासारखी वागणूक देण्यासाठी देखील तयार नव्हते. माणसाचे निसर्गदत्त अधिकार आहेत ते मिळवून देण्याची सुद्धा त्यांना जाणीव होत नव्हती. व्यवस्थेने हजारो वर्षांपासून आवाज दाबून टाकलेल्या समाजाला मूकनायक च्या रूपाने नवा आवाज मिळाला. बाबासाहेबांची पत्रकारिता आक्रमक तितकीच संयमी होती. त्यांच्या प्रत्येक लेखातून त्यांच्या विद्वत्तेचे दर्शन झाल्याशिवाय राहत नाही. त्यांचे लेख प्रचंड कोटीचे तत्त्वज्ञान होते. त्यांच्या मते एखादी जात अवनत झाली तर त्या अवनतीचा चट्टा इतर जातीला बसल्याशिवाय राहणार नाही.

पत्रकारितेसाठी तत्कालीन परिस्थितीत फक्त आपल्या चळवळीचे मुखपत्र म्हणून त्यांनी वृत्तपत्र चालवले नाही तर एकूण जागतिक घडामोडींचा आढावा देखील त्यातून त्यांनी घेतला आहे. ते उच्च शिक्षणासाठी लंडनला जाताना मूकनायकची पूर्ण जबाबदारी त्यांनी ज्ञानदेव घोलप यांच्याकडे सोपवली. तरीही विदेशातून ते बातम्या, लेख, इतर माहिती स्वतःच पाठवत असत. बाबासाहेब शिक्षण संपवून परत येईपर्यंत ढासळत्या आर्थिक स्थितीमुळे मूकनायक बंद झाला. पुन्हा बाबासाहेबांनी पूर्ण जुळवाजुळव करून बहिष्कृत भारत च्या नावाने ३ एप्रिल १९२७ ला नवीन पाक्षिक सुरू केले. यातून त्यांची पत्रकारिता




सर्वार्थाने प्रगल्भ झाल्याचे दिसून येते. त्यांचे मजकूर मांडणी अप्रतिम होते. 'आजकालचे प्रश्न' नावाने चालू घडामोडी विषयींचे सदर ,अग्रलेख ,आत्मवृत्त, विचारविनिमय, वर्तमान सार, विविध विचार संग्रह अशी त्यांची सदरे नियमित सुरू होती. 'बहिष्कृत भारत' सुरू झाले त्यावेळी महाड येथील धर्मसंगरालाही सुरुवात झाली होती. त्यामुळे अनुकूल वातावरण निर्माण करण्यात मोलाची भर घातलेली दिसून येते. या पत्रातून ही बाबासाहेबांचे भाषावैभव अत्यंत खुलून दिसते. त्यांच्या प्रत्येक शीर्षकातून त्यांची विद्वत्ता आपल्याला जाणवते. त्यांची शीर्षके, 'आरसा आहे, नाक असेल तर तोंड पाहून घ्या', 'खोट्याच्या साक्षीने खरे सिद्ध होते काय?' 'आपलेपणाची साक्ष दे, नाहीतर पाणी सोड ' 'गुण श्रेष्ठ की जात श्रेष्ठ ' 'बहिष्कृत भारताचे ऋण हे लौकिक ऋण नव्हे काय ?' 'खरे बोल निश्चयात आहे समुच्चयात नाही' अशा त्यांच्या शीर्षकाखाली लिखाण चालत असे. त्या लेखांमधून बहिष्कृत भारतने अक्षरशः रान पेटवले.

त्याकाळी बाबासाहेबांना प्रस्तावित वृत्त पत्रकारांशी देखील तेवढ्याच निकराने झुंज द्यावी लागली. दक्षिण आफ्रिकेत हिंदी लोकांना तुच्छतेने वागविण्यात येते म्हणून तुमच्या अंगाचा संताप होतो.या देशात युरोपियन, युरेशियन लोकांसाठी वेगवेगळे आगगाडीचे डबे राखून ठेवले तुम्हास खपत नाही. एडिंबरो येथील हिंदी लोकांना तिथल्या कित्तेक हॉटेलमध्ये जाऊन गोऱ्या मॅडमांबरोबर नाचण्याची बंदी केली म्हणून तुम्ही आकाशपाताळ एक केले. पण अस्पृश्यतेच्यापायी होणारी मानहानी आणि उन्नतीच्या मार्गावर होणारी कायमची बंदी यांच्यापुढे सदरील निर्बंध म्हणजे काहीच नव्हेत, ही गोष्ट तुम्हाला अद्यापि पटत नाही असे खडसावून विचारायला बाबासाहेब मागेपुढे पहात नाहीत. टीकाकारांपुढे बाबासाहेब कधीच झूकले नाहीत. आपल्या विद्वत्तेने, वाक्चातुर्याने हजरजबाबी स्वभावाने त्यांनी त्यांच्या टीकाकारांना नामोहरम केले. अत्यंत प्रतिकूल परिस्थितिशी सामना करणारी म्हणून त्यांची पत्रकारिता त्यावेळच्या इतर पत्रकारांपेक्षा अतिशय भिन्न स्वरूपाची म्हणावी लागेल. अशिक्षित, दारिद्र्याने पिचलेल्या समाजाचे नेतृत्व करायचे, त्यात वृत्तपत्र स्वतःच्या आर्थिक पायावर भक्कमपणे उभे नसलेले. अशी अत्यंत प्रतिकूल परिस्थिती असूनही वृत्तपत्रासाठी केवळ बातम्या किंवा लेख लिहून रकानेच्या रकाने भरण्याचा धंदा त्यांनी केला नाही तर त्यातला प्रत्येक शब्द तोलून मापून लोकांपर्यंत जाईल यासाठी ते दक्ष राहिले. सध्याच्या पत्रकारितेने डॉ. आंबेडकरांच्या पत्रकारितेकडून खूप काही शिकण्यासारखे आहे. पत्रकार वृत्तपत्र लोकप्रिय होण्यासाठी अनेक नैतिक-अनैतिक मार्गसुद्धा बिनबोभाटपणे चोखाळताना दिसतात. हल्ली तरी वृत्तपत्र चालवणे हा व्यवसाय झाला असल्याने स्पर्धा वाढली आहे. तडजोडी कराव्या लागतात. अशी मल्लीनाथी करून त्या कृतीचे समर्थन देखील केले जाते. परंतु साधन सामग्री तंत्रज्ञान उपलब्ध असून सुद्धा वृत्तपत्राचा मालक, संपादक जनतेच्या मनावर कायमची पकड घेऊ शकत नाही हेही तितकेच खरे आहे. दारिद्र्य रेषेखाली असलेल्या ५० कोटी जनतेच्या कोणतेही प्रश्नांपेक्षा क्रिकेट, शेअर निर्देशांक आणि पुढार्यांच्या प्रसिद्धीला जास्त जागा दिली जाते. कुपोषित बालकांचे नाव न सांगता कोणते पौष्टिक खाद्य आहेत किंवा कोणता अभिनेता साईबाबांच्या, गणपतीच्या दर्शनाला अनवाणी गेला, कोणावर खटले चालू आहेत हे मात्र चवीचवीने सांगितले जाते. दैनिकाचा मालक अथवा संपादक जनतेचा पुढारी असतो. मात्र तो राजकीय नेता किंवा चमचा म्हणूनच वावरताना दिसतो. सर्व प्रश्नांची उत्तरे राजकीय सत्य शोधण्याची सवय त्याला लागलेली असल्याने तो फक्त पुढारी होतो. सत्ता आणि संपत्ती या दोन कारणांसाठी त्याचं पुढारीपण उरतं. अनेक सामाजिक विषयावर निकराची लढाई देण्याची आवश्यकता असूनही ते विषय त्याच्या गावीही नसतात. त्यामुळे आंबेडकरांची पत्रकारिता अभ्यासण्याची नितांत गरज आहे. ते कोट्यावधी जनतेचे नेते होते. परंतु त्यांनी व्यवसायिक तडजोड कधीच केली नाही. त्यांची कारकीर्द अंतर्मुख व्हायला भाग पाडते.

डॉ. आंबेडकरांचं माध्यमांशी असलेलं नातं व्यामिश्र होतं. ते संपादक तसेच सल्लागारही होते. त्यांची ही चळवळ गरीब लोकांची चळवळ होती. त्यांच्या समर्थ वर्गातील लोक कूळ वा वेठबिगार म्हणून काम करणारे वंचित होते. आर्थिकदृष्ट्या वर्ग सर्वात कमी संसाधनं बाळगून होता. त्यामुळे त्यांना काहीही पाठिंबा नसताना सुद्धा त्यांनी एकट्याच्या जीवावर सर्व पत्रकारिता चालवलेली होती. लंडनमधील द टाईम्स, ऑस्ट्रेलियातील डेली मर्क्युरी, न्यूयॉर्क टाईम्समधील न्यूज अमेरिकन जर्नल यासारख्या विख्यात आंतरराष्ट्रीय वर्तमानपत्रासह काळ्या लोकांनी चालवलेल्या वर्तमानपत्रांनी आंबेडकरांच्या अस्पृश्यताविरोधी चळवळीमध्ये आणि गांधी-आंबेडकर संघर्षामध्ये बराच रस घेतला होता. राज्यघटना निर्मितीमधील आंबेडकर यांची भूमिका संसदेतील त्यांचे युक्तिवाद, सादरीकरण आणि नेहरूंच्या मंत्रिमंडळाचा त्यांनी दिलेला राजीनामा या घडामोडींकडे जगाचं लक्ष होतं. आरंभीच्या वर्षांमध्ये राजर्षी शाहू महाराजांनी या नियतकालिकाला पाठिंबा दिला होता.त्यांनी अस्पृश्यांसाठी नवे विचारयुग निर्माण केले. अस्पृश्यांना त्यांच्या अस्तित्वाची व भवितव्याची जाणीव करून देण्याचे साधन म्हणून काम केले असे गंगाधर पानतावणे म्हणतात.मूकनायकचे कार्य संपुष्टात आल्यावर काही वर्षांनी महाड चळवळीला गती प्राप्त झालेली असताना ३ एप्रिल १९२७ रोजी आंबेडकरांनी बहिष्कृत भारत या नियतकालिकाच्या रूपाने पुन्हा पत्रकारितेत मुसंडी मारली.१९२८ साली 'समता'चा उदय झाला आणि बहिष्कृत भारतला नवसंजीवनी मिळून २४ नोव्हेंबर १९३० रोजी जनता या नावाने ते प्रकाशित होऊ लागले. 'जनता' हे दलितांचे सर्वाधिक काळ चाललेले दैनिक ठरले. २५ वर्ष सुरू राहिलेल्या जनताचं नामकरण १९५६ झाली 'प्रबुद्ध भारत' असे करण्यात आले. आंबेडकरांच्या चळवळीला प्राप्त झालेल्या गतीशी सुसंगत हा बदल होता. १९६१ सालपर्यंत हे प्रकाशन सुरू राहिलं. खऱ्या अर्थाने दलितांचं सर्वाधिक काळ सुरू राहिलेले हे स्वतंत्र प्रसार माध्यम होतं. हे सर्व पुरोगामी सवर्ण पत्रकार व संपादकांचा वापर या कार्यामध्ये करून घेतला. अनेक नियतकालिकांचे संपादन वेळोवेळी ब्राह्मण संपादकाच्या हातात होतं. 'बहिष्कृत भारत'ला पुरेसे लेखक मिळत नसल्यामुळे २४/२४ रकाने भरण्याची जबाबदारी संपादकांवर पडायची. 'प्रबुद्ध भारत' सुरू होतं तोवर त्याचं संपादन यशवंत आंबेडकर, मुकुंदराव आंबेडकर, दादासाहेब रूपवते, शंकरराव खरात ,भास्करराव काद्रेकर यांनी केले. आंबेडकरांच्या आधी काही मोजके नियतकालिक अस्पृश्यांच्या जगण्यातबाबत वार्तांकन करत असत. महात्मा फुले यांनी सत्यशोधक चळवळीतून 'दीनबंधू' हे बहुजन वर्तमानपत्र सुरू केलं होतं. ज्येष्ठ नेते गोपाळबाबा वलंगकर यांना पहिला दलित पत्रकार मानलं जातं. 'दीनबंधू', 'दीनमित्र' व सुधारक या नियतकालिकांमध्ये त्यांनी जात व अस्पृश्यतेबद्दल केलेलं लेखन पथदर्शी ठरले. ते अतुलनीय विद्वान होते. हिंदूधार्मिक व्यवस्थेची त्यांनी केलेली चिकित्सा 'विटाळ विध्वंसक' या पुस्तकाद्वारे प्रकाशित झाली. या महान नेत्यांनी अधिकाऱ्यांचा कैवार घेण्यासाठी पत्रकारितेचा वापर केला.'सोमवंशीय मित्र' हे पहिलं दलित वर्तमानपत्र सुरू करण्याचं संपादनाचं श्रेय कांबळे यांना जातं. दलित चळवळीतील आणखी मोठे नेते इम्प्रेस मिल मधील कामगारांचे नेतृत्व केलेले किसन बनसोडे यांनी छापखाना सुरू केला होता.त्यांनी 'निराश्रित हिंदू नागरिक' 'मजुर पत्रिका' 'चोखामेळा' ही प्रकाशनं स्वतःच्या छापखान्यातून प्रकाशित केली. डॉ.आंबेडकरांच्या या लक्षणीय कामगिरीबद्दल १९८७ सालापासून दखल घेतली गेली. त्यांचे पत्रकारी लेखन काव्यात्म आहे, त्यात बरीच वितंडही आहे. विरोधकांना विचारपूर्वक तोडीस तोड प्रत्युत्तरं दिलेली आहेत. अस्पृश्यां वरील अत्याचार व कल्याणकारी धोरणे यांचा कालानुसार घटनाक्रम मांडून केलेला वैविध्यपूर्ण युक्तीवाद त्यांच्या लेखनामध्ये आढळतो. सामाजिक व राजकीय सुधारणासंबंधित सरकारी धोरणं राजकीय पक्षांच्या भूमिका या संदर्भात आंबेडकरांनी जोरकस भाष्य केलेले आहे. त्यांच्या विचारांचा मुक्त प्रवाह पाहण्याची संधी त्यांच्या पत्रकारी लेखनातून पाहायला मिळते. ते अतिशय सखोल निबंधकार व तात्विकदृष्ट्या सक्षम विचारवंत होते. त्यांनी काढलेल्या नियतकालिकांच्या आवरणावर दलितांच्या स्वातंत्र्याची व त्यांच्या जीवनानुभवांची छायाचित्रं छापलेली आहेत. पत्रकारिता हा कायमच दलित चळवळीचा अविभाज्य भाग राहिलेला आहे. दलितांच्या नेतृत्वाखालील सामाजिक व राजकीय उपक्रमांना समांतरपणे त्यांची पत्रकारिताही सुरू राहिली. आंबेडकरांच्या काळाप्रमाणे आजही दलितांना छापील माध्यमांमधील पत्रकारिता असाध्य आहे.

आंबेडकरांचे पत्रकारी लेखन मराठीत आहे. ते लेखन आपला राष्ट्रीय ठेवा आहे. त्यामुळे त्यांचे पत्रकारी प्रहार अनेक भाषांमध्ये जनतेसाठी मुक्तपणे उपलब्ध करून द्यायला हवेत. तळागाळातील लोकांसाठी आवाज उठवणारी यंत्रणा म्हणजे पत्रकारिता आहे. ती समाजमनाचा आरसा आहे. त्यामुळे जनतेतील प्रश्न सोडवण्यासाठी पत्रकारितेचा वापर होणे गरजेचे आहे.

पान १/४ वरून पुढे...

## अरबाजच्या सप्तरंगात....

कार्यक्रमाचे सूत्र संचालन प्रा नदीम शेख तर प्रस्ताविक अजमेर मणियार यांनी केले.

### विस्थापितांची सदर आणि नवे राजकीय समीकरण

मुस्लिमांच्या आस्था आणि अस्मिता नेहमी पायदळी तुडवल्या जाणार असतील तर सत्तेला राजकीय उत्तर देण्याची सज्जड भाषा यावेळी बोलण्यात आली स्थानिक स्वराज्य संस्था असूत किंवा लोकसभा विधानसभा आमची मते गृहीत धरले जातात आणि यातून आम्हाला राजकारणात आमचे मूल्य दिले जातं नाही. मुस्लिम युवकांना सोबत घेऊन राजकीय भूमिका असल्याशिवाय संघटना वांझोटी असते त्यामुळे राजकारण माझ्या समाजासाठी ही उघड भूमिका अरबाज पठाण यांनी घेत आपण ताकाला जाऊन भांडे लपवणार नसल्याचे अरबाज यांनी म्हटले यावेळी पत्रकार अजमेर मणियार,साजेद पाशा,अलीम सय्यद,वसीम मणियार, अमन शेख,इम्रान शेख, नदीम शेख, रफिक पटेल,अफजल सय्यद,मुस्तकीम शेख,सरफराज शेख,अखिल सय्यद, सोहेल खान, अफरोज शेख, शोकत पटेल,अमजत शेख,शेहदाद शेख,आरिफ कुरेशी,निहाल दादा,नाबील फारुकी,शैबाज शेख,मुकीद सय्यद समीर सय्यद,अझर इनामदार,आमेर सय्यद,बबलू जहागीरदार, शाहेर जहगीरदार,तोसिफ सय्यद,आतेफ मणियार,सुमेर पटेल,रियाज काझी,सोहेल आतार,इकबाल भाऊ,रियाज राजे,नाजीम भाई आष्टी,शैबाज भाई आष्टी,अजीम भाई आष्टी,अमर शेख,अस्लम कुरेशी वडवणी,जहागीर भाई अंबाजोगाई, आमेर युवा,दानिश कुरेशी शहागड,

## जिल्हा रुग्णालयातील...

चुकीमुळेच झाला असल्याचा आरोप महिलेच्या पतीने व नातेवाईकांनी केला असून या प्रकरणात दोषी डॉक्टर व स्टाफ नर्स यांच्यावर निलंबरांची तात्काळ कारवाई करत गुन्हे दाखल करण्याची मागणी महाराष्ट्र निर्माण सेनेच्या महिला राज्य उपाध्यक्ष वर्षा जगदाळे यांनी केली आहे.

## सुरेश धस, संदीप...

संदीप क्षीरसागर हे त्यावेळी जिल्हा परिषदेचे शिक्षण सभापती होते. त्या काळात ही सगळे भरती झाली आहे. त्या काळात प्रत्येक जणांकडून तीन लाख रुपये घेण्यात आले. तेराशे लोकांचे तीन लाख रुपये म्हणजेच एकूण जवळपास ३९ कोटी रुपयांचा घोटाळा २०१४ झाला असा आरोप त्यांनी केलाय.

बिंदू नामावलीच्या माध्यमातून एका समाजाला टार्गेट करण्याचे काम २०१४ ते २४ पर्यंत बिंदू नामावलीचा प्रश्न कुठेच निघाला नाही. मात्र आता आमदार सुरेश धस हा प्रश्न उपस्थित करून जाती-जातीत तेढ निर्माण करत आहेत. एका समाजाला टार्गेट करण्याचे काम करत आहेत. धस यांनी राज्याच्या मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्र्यांची दिशाभूल केली आहे. त्यामुळे आम्ही मंगळवारी शिक्षकांचे शिष्टमंडळ घेऊन राज्याच्या मुख्यमंत्र्यांना भेटणार आहे. उपमुख्यमंत्री अजित पवार आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची देखील भेट घेणार आहोत, असे त्यांनी यावेळी सांगितले.

भरती प्रक्रियेत पंकजा मुंडे यांचा कुठलाही संबंध नव्हता- सुरेश धस यांनी स्टेटमेंट केले की, पंकजा मुंडे मंत्री असताना हा घोटाळा झाला आहे. परंतु पंकजा मुंडे त्यावेळी मंत्री नव्हत्या. या भरती प्रक्रियेत पंकजा मुंडे यांचा कुठलाही संबंध नव्हता. २०१४ साली इतके सगळे शिक्षक बीडमध्ये आले, तेव्हा ७०० लोकांना पगार मिळत नव्हता. दीड वर्ष शिक्षकांनी येथे आंदोलन केले होते. या आंदोलनाला कारणीभूत हे तिघेच आहेत. जागा नसताना भरती करून घेण्यात आली, याचे देखील कारण हे तिघेच आहेत. त्यामुळे सुरेश धस, सय्यद अब्दुल्ला, संदीप क्षीरसागर यांच्यावर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी बाळासाहेब सानप यांनी केली आहे.

## डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी....

रात्रंदिवस आथक मेहनत व परिश्रम घेऊन तयार केले आहे जर भारतातील प्रत्येक गोरगरीब,शोषित,पीडित शेतकरी शेतमजूर या सर्व जातीधर्मांच्या लोकांना न्याय देण्याची काम करणार आहे परंतु या संविधानाची अंमलबजावणी करणारे हात किंवा अंमलबजावणी करणारे लोक हे किती लायक आहेत यावर या संविधानाची यशस्विता अवलंबून असणार आहे संविधानाचे अंमलबजावणी करणारे किंवा राबविणारे लोकप्रतिनिधी हे जर लायक असतील चांगले असतील तर ते संविधानानुसार,भारतीय राज्यघटनेनुसार भारतातील प्रत्येक जाती धर्मांच्या,गोरगरीब, श्रीमंत मध्यमवर्गीय,प्रत्येकच भारतीय नागरिकाला न्याय देणारी व सर्व हक्क अधिकार, जीवन जगण्याचा अधिकार देणारे आहेत परंतु शर्थ हीच आहे की हे संविधान राबवणारे लोक योग्य असले पाहिजेत किंवा पात्र असले पाहिजेत किंवा लायक असले पाहिजेत परंतु जेव्हा हे लोक पात्र नसतील लायक नसतील, नालायक असतील तर मात्र हे संविधान, ही राज्यघटना भारतातील प्रत्येक जाती धर्माच्या माणसाला न्याय देण्यात अपयशी ठरेल. अशी भीती डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांनी त्यावेळेसच व्यक्त केली होती असे मत रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाचे बीड जिल्हा अध्यक्ष विजय दादा साळवे यांनी डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर जयंतीच्या पूर्व संध्यला अभिवादन करताना व्यक्त केले पुढे बोलताना ते म्हणाले की,डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर हे भारताच्या संविधानाच्या मसुदा समितीचे अध्यक्ष होते आपल्या ४नोव्हेंबर १९४८ रोजी केलेल्या भाषणात बाबासाहेबांनी भारतीयांची मानसिकता व्यक्ति पूजेकडे असते असे म्हटले होते बाबासाहेबांनी स्टुअर्ट मिलचा दाखला देऊन म्हटले होते आणि सावधगिरी बाळगायला सांगितले होते जॉन स्टुअर्ट मिल म्हणतात आपल्या स्वातंत्र्य एखाद्या थोर माणसाच्या पायथ्याशी अर्पण करू नये बाबासाहेब पुढे असे म्हणतात की भारतातील राजकारणात भक्ती भाव किंवा विभूती पूजा यांचा जितक प्रमाण आहे तितकं प्रमाण जगाच्या इतर कोणत्याही देशात आढळणार नाही भक्ती भाव हा मोक्षाकडे नेणारा मार्ग असू शकतो पण राजकारणात मात्र भक्ती भाव किंवा विभूती पूजा हा निश्चितपणे अवनीतीकडे आणि अखेरीस हुकूमशाही कडे नेणारा मार्ग आहे हे डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांनी दुसरा इशारा दिला होता आपण आपल्या राजकीय लोकशाहीला सामाजिक लोकशाही सुद्धा करायला हवी २६ जानेवारी १९५० रोजी आपण एका आंतरविरोधात भरलेल्या जीवनात प्रवेश करणार आहोत आपल्या राजकारणात समता असेल आणि सामाजिक व आर्थिक जीवनात विषमता असेल राजकारणात आपण एक माणूस एक मताने एक मत एक मूल्य या तत्त्वाला मान्यता दिली आहे पण आपल्या सामाजिक व आर्थिक जीवनात मात्र एक माणूस एक मूल्य करत राहो याचा अर्थ असा की आपण कधीही आपल्या जीवनात समता नाकरत राहणारा आहोत भारतीय समाज जाती विषमतेमुळे कसा विद्रूप बनला आहे याची जाणीव आंबेडकरांना होती म्हणून बाबासाहेब आंबेडकरांनी समता स्वातंत्र्य बंधुत्व या तत्त्वावर आधारित भारताचे संविधान लिहिले होते असेही बीड जिल्हा रिपाईचे अध्यक्ष विजय दादा साळवे म्हणाले.

पान १/४ वरून पुढे...

## बीडमध्ये उसळणार....

सकाळी ८ वाजता अभिवादन रॅली काढली जाणार आहे. सदरील रॅली डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळा इथपर्यंत काढली जाणार आहे. त्यानंतर सकाळी ९ वाजता पंचशील ध्वजारोहण करून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन केले जाणार आहे. सायंकाळी सहा वाजता छत्रपती शिवाजी महाराज चौक येथून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेची भव्य मिरवणूक निघणार आहे. या मिरवणुकीत डॉ. बाबासाहेब आंबेडकर सार्वजनिक जयंती उत्सव समितीचा रथ तसेच शहरातील जवळपास शंभर जयभीम महोत्सव उत्सव समित्या मिरवणुकीत सहभागी होणार आहेत.

## आमचा आजही सर्वांगिण...

व्याख्यान मालेचे आयोजन करण्यात आले होते.त्यावेळी धम्मसंगिनी रमागोरख बोलत होत्या.या व्याख्यान माला कार्यक्रमाला अध्यक्ष म्हणून मैनाताई बोराडे उपस्थित होत्या. प्रमुख पाहुणे म्हणून मनिषा तोकले, सुशीलाताई मोराळे,सिमा ओस्तवाल आदींची प्रमुख उपस्थिती होती. उपस्थित आंबेडकरी जनतेस संबोधित करतांना धम्मसंगिनी रामगोरख म्हणाल्या की,आंबेडकरवादी महिलांच्या सामाजिक आणि आर्थिक सशक्तीकरणाचा प्रश्न म्हणावा तेवढा सुटलेला नाही.धम्मसंगिनी असही म्हणाल्या की, बाबासाहेबांनी आपल्याला बौद्ध धम्म देवून प्रज्ञा, शिल, करुणा रुजविली आहे.तसेच संविधान लिहून हजारो वर्षांची सनातनी व्यवस्था लथाडून आपल्याला माणूस म्हणून जगण्याचा हक्क मिळवून दिला. मात्र आज त्या हक्कांवर विविध मार्गांने संकटे आणली जात आहेत. त्यामुळे आंबेडकरी जनतेने सावध रहायला हवे.असे परखड मत धम्म संगिनी रमागोरख यांनी व्यक्त केले. या व्याख्यान मालेच्या कार्यक्रमाचे प्रास्ताविक माया दिवाण यांनी केले. सूत्रसंचालन शैलजा चिलवंत तर आभार प्रदर्शन मायाताई चोपडे-सोनवणे यांनी मानले.

## हरिनाम सप्ताह...

काल्याच्या किर्तनाने सांगता झाली.यावेळी राजेंद्र मस्के यांनी भक्तांना संबोधीत करताना संबोधीत केले. अखंड हरिनाम सप्ताह म्हणजे केवळ धार्मिक कार्यक्रम नाही, तर आपल्या जीवनात सकारात्मक बदल घडवणारा एक पवित्र सोहळा आहे.हरिनाम सप्ताहा दरम्यान घडणारे प्रभूचे नामस्मरण भजन, कीर्तन, प्रवचनाच्या माध्यमातून भक्तिरस अनुभवता येतो.नामस्मरणाने मनाला शांती मिळते, मानसीक तणाव दूर होण्यास मदत होते. ईश्वरावरील श्रद्धा वाढीस लागते. ईश्वरा पुढे सर्वजण समान असतात या भावनेतून अशा मंगलमय सोहळ्यात भेदभाव विसरून ईश्वर भक्त निरपेक्ष भावनेने सहभागी होतात. समाजामध्ये एकोपा, प्रेम आणि परस्परांत सहकार्य भावना निर्माण होते. ग्रामीण संस्कृतीत सप्ताहाला वेगळं महत्त्व आहे. गावो गावी होणारे अखंड हरिनाम सप्ताह सामाजिक एकतेचे संस्कार केंद्र व्हावेत अशी भावना शरदचंद्र पवार राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के यांनी बेलगाव येथील अखंड हरिनाम सप्ताह सांगता समारंभ प्रसंगी भाविक भक्तांना संबोधित करताना व्यक्त केली आहे. प्रख्यात देवस्थान बेलेश्वर परिसरातील बेलगाव येथे बेलेश्वर संस्थान महंत महादेव महाराज यांच्या प्रमुख उपस्थितीत व हभप तुकाराम महाराज यांच्या काल्याच्या किर्तनाने सांगता झाली. यावेळी अश्विन शेळके, दिलीप शेळके, जाधव अशोक, अंकुश शेळके,आदी मान्यवर उपस्थित होते.

पान १/४ वरून पुढे...

## स्व.सौ. सुरेखाताई ...

या महोत्सवाची सांगता रविवार दि.२०.०४.२०२५ रोजी सकाळी ८.०० ते १०.०० या वेळेत नगरप्रदक्षिणा होईल त्यानंतर सकाळी १०.०० ते १२.०० या वेळेत ह.भ.प. प्रेममुर्ती महंत शिवाजी महाराज श्री क्षेत्र संस्थान नारायणगड यांचे काल्याचे किर्तन होईल त्यानंतर महाप्रसादाचा कार्यक्रम होणार आहे. या कीर्तन महोत्सवास जिल्ह्यातील व जिल्ह्याबाहेरील संत, महंतांची उपस्थिती राहणार असून महाराष्ट्रातील नामवंत मृदंगाचार्य व गायनाचार्य उपस्थित राहणार आहेत तरी या पंचदिनात्मक कीर्तन महोत्सवाचा परिसरातील भाविक भक्तांनी लाभ घ्यावा असे आवाहन मंगलमुर्ती देवस्थान नवगण राजुरीचे अध्यक्ष रविंद्र क्षीरसागर, माजी उपनगराध्यक्ष हेमंत क्षीरसागर यांनी केले आहे.

## मस्साजोग येथील...

खोलीकरणाच्या कामाला भेट देण्यासाठी आले. काम प्रगतीपथावर आहे. एक किलोमीटर पेक्षा जास्त नदीच्या क्षेत्रातील गाळ काढण्याचे काम झाले असून आणखी अडीच किलोमीटर ते तीन किलोमीटर पर्यंत हे काम पुढे जात आहे. एक किलोमीटर परिसरात फेरफटका मारून त्यांनी कामाची पाहणी केली. या एक किलोमीटरच्या कामांमध्ये दोन ठिकाणी बंधारे असल्याने मोठ्या प्रमाणात पाणीसाठा होणार आहे. शेतकऱ्यांना या पाण्याचा पुरेपूर उपयोग घेता येईल. यातून यावर्षीतील पिके जोमात येतील. पाणीसाठा निर्माण करण्याचे आणि शेतकऱ्यांचे जीवनमान उंचावण्याचे संतोष देशमुख यांचे स्वप्न यातून पूर्ण होईल. नाम फाउंडेशन मार्फत नदी खोलीकरणासाठी दिलेले पोकलेन मशीन उत्तम रीतीने कार्यरत असून डिझेलचा खर्च देखील नाम फाउंडेशन करत असल्याने मस्साजोग विकासात नाम फाउंडेशनचा मोठा हातभार लागलेला आहे. त्यामुळे येथील शेतकरी नाम फाउंडेशनचे कायम ऋणी राहतील, असे शेतकरी या वेळेस म्हणत होते. या पाहणीच्या वेळी ॲड. अजित देशमुख यांच्यासह धनंजय देशमुख, भागवत कदम, तुषार देशमुख, गोवर्धन मस्के, मनोज देशमुख, यांच्यासह अन्य शेतकरी उपस्थित होते.

## शिवसेना सदस्य...

भागवताचार्य सर्जेराव महाराज काशीद, पत्रकार संघाचे तालुकाध्यक्ष उमेश मोगरेकर यांच्या प्रमुख उपस्थितीत दिनांक १२ एप्रिल रोजी हनुमान जयंतीच्या मुहूर्तावर सकाळी दहा वाजता छत्रपती शिवाजी महाराज चौकात शिवसेना सदस्य नोंदणी चा शुभारंभ करण्यात आला यावेळी शिवसेना तालुकाप्रमुख तुकाराम येवले शहर प्रमुख धनंजय पापा सोळंके युवा सेनेचे तालुकाप्रमुख अभिजीत कोंबडे महिला आघाडीच्या उपजिल्हाप्रमुख शारदाताई डोईजड रामेश्वर काशीद प्रशांत टमके माऊली वाघमारे योगेश उगले,आदी नी दिवसभर शिवसेना सदस्य नोंदणी केली जनतेतून उस्फूर्त प्रतिसाद मिळत आहे.

## जयभीम महोत्सवात ...

महाविद्यालयात १८ तास वाचन उपक्रम राबविण्यात आला होता.वाचन समितीचे सुमिध जोगदंड, प्रा. अशोक गायकवाड, स्वप्नील चोपडे सुयोग्य नियोजन केले होते. या उपक्रमात वंदनाताई काशिनाथ वाघमारे,मंदाताई रोहीदास मस्के,प्रतिभा रंजीत वाघमारे,पंचशिला भास्कर सरपते,शीतल बाबासाहेब पालके व शेकडो विद्यार्थ्यांनी आपला सहभाग नोंदवला होता.

Daily Marathwada Patra Owner, Printer, published and Editor Dattatray Sakharam Narnale has Printed in Gugladevi, Printers Subhash Road, Malives, Kabad Galli, Beed (Rural) City, Beed Beed 431122 (Maharashtra). Office of Dainik Marathwada Patra Subhash road, Malives, Kabad Galli, Beed Tq- Beed Dist- Beed pin 431122 (Maharashtra) Mo. 9822152955, E-mail- dailymarathwadapatra2021@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com
हे पत्र प्रकाशक मुद्रक व मालक दत्तात्रय सखाराम नरनाळे यांनी गुगळादेवी प्रिंटर्स, सुभाष रोड, माळीवेस, कबाड गल्ली, बीड, ता.जि. बीड – ४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक मराठवाडा पत्र सुभाष रोड, माळीवेस, कबाडगल्ली, बीड ता. जि. बीड – ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. मोबा. ९८२२१५२९५५ संपादक – दत्तात्रय सखाराम नरनाळे, E-mail-marathwadapatra@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com

दैनिक मराठवाडा पत्र

संमिश्र

सोमवार, दि. १४ एप्रील २०२५

पान ३

# बीडमधील सावरकर स्मारकाचे सुशोभीकरण अंतिम टप्प्यात

## युवा नेते डॉ.योगेश क्षीरसागर यांनी केली पाहणी ; स्मारकातील डोम, सौंदर्यीकरणाचे काम दर्जेदार

**बीड । प्रतिनिधी**

शहरातील जवाहर कॉलनी परिसरात उभारण्यात येत असलेल्या स्वातंत्र्यवीर वि.दा. सावरकर यांच्या स्मारकाच्या सुशोभीकरणाचे व डोम उभारण्याचे काम अंतिम टप्प्यात आले आहे. येत्या काही दिवसांत हे काम पूर्ण होण्याची अपेक्षा असून, राष्ट्रवादी काँग्रेसचे युवा नेते डॉ. योगेश क्षीरसागर यांनी रविवारी (दि.१३) स्मारकाला भेट देऊन कामाची पाहणी केली. त्यांनी कामाच्या दर्जाचे कौतुक



केले असून, सावरकर प्रेमींनीही या गुणवत्तापूर्ण कामाविषयी सम ाधान व्यक्त केले आहे.

स्मारकाचे रूप अधिक भव्य आणि प्रेरणादायी ठरणार असल्याचा विश्वास सावरकर विचारधारेच्या कार्यकर्त्यांनी व्यक्त केला आहे. पाहणीप्रसंगी माजी नगरसेवक सुभाष सपकाळ, संपादक दिलीप खिस्ती, वीर सावरकर सामाजिक प्रतिष्ठानचे अध्यक्ष डॉ.अजिंक्य पांडव, ॲड. मिलिंद वाघिरकर, कुलदीप धुमाळे, डॉ.राजेश भुसारी, प्रा.अभय पटवारी, डॉ.सुहास देशपांडे, डॉ.प्रसाद वाघीरकर, प्रा.मिलिंद शिवणिकर, डॉ. अजय कुलकर्णी, सतिश देशपांडे, त्रिंबक देशपांडे, डॉ.यु. डी.कुलकर्णी, महेश कुलकर्णी, प्रकाश गोरकर, विजय कोटुळे, विशाल जोशी, प्रा.उमेश बोबडे, अंकित जोशी, अनिल जोशी, अभिजित वैद्य, दिलीप जवळीकर, गोविंद शिवणीकर आदी मान्यवर व सावरकरप्रेमी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



*छत्रपती संभाजीनगर : मां. सुनील केंद्रेकर साहेब हे जिल्हाधिकारी, विभागीय आयुक्त अशा पदावर चोख काम केल्यानंतर आता शेतीत काम करताना. साधी विचारसरणी असलेली माणसं अशी असतात.*



*ईट: बीड तालुक्यातील मौजे ईट येथील गुगळादेवी यात्रे निमित्त कुस्त्यानाचा असा फड रंगला होता त्यामधील छायाचित्रं.*

# मशिदीच्या न्यायप्रविष्ठ जमीनीवर प्लॉटींगचा घाट विचारणा करणाऱ्याच्या अंगावर ट्रक्टर घालण्याचा प्रयत्न

**किल्ले धारुर । प्रतिनिधी**

शहरालगत असलेल्या आडस रोडवरील सर्वे नंबर ५५६ ,६१० समस्त मस्जिदच्या ४४ एकर जमिनीचे प्रकरण उच्च न्यायालयात न्याय प्रविष्ट असताना या जमिनीवर लँड माफियाकडून सपाटीकरण करण्याच काम सुरु असून सदर प्रकारावर विचारणा केली असता दोघांच्या अंगावरच ट्रक्टर घालून जीवे मारण्याचा प्रयत्न झाला. याबाबत धारुर पोलिसांत तक्रार देण्यासाठी गेले असता पोलिसांनी तक्रार घेण्यास टाळाटाळ केली असल्याची प्रतिक्रिया तक्रारदार सय्यद रज्जाक व शेख अक्रम यांनी दिली.



याबाबत सविस्तर वृत्त असे की, धारुर शहरात अनेक इनाम जमिनी आहेत. यापैकी अनेक जमिनीवर दावे प्रतिदावे वादविवाद सुरु आहेत. धारूर शहरालगत आडस रोडवर बीड येथील समस्त मशिदीची ४४ एकर खिदमतमाश जमीन आहे. या जमिनीबाबतही गेल्या काही वर्षांपासून न्यायालयात वाद विवाद सुरु आहेत. या न्यायालयीन वादात यापुर्वी दोन ठिकाणी जमिनीच्या वादावर न्यायालयाने मस्जिदची खिदमतमाश जमीन म्हणून निर्णय दिलेला असून या जमिनीचे खरेदीविक्री व्यवहार अवैध ठरवण्यात आलेले आहेत. या निर्णयाच्या विरोधात उच्च न्यायालयात आवाहन देण्यात आलेले आहे. उच्च न्यायालयात अद्याप प्रकरण न्यायप्रविष्ट असताना दि.१२ रोजी सदर न्यायप्रविष्ट जमिनीवर ३० ते ४० लोक चार ट्रक्टरद्वारे सपाटीकरण करण्याचे काम करत असल्याचे दिसून आले. यावेळी सय्यद रज्जाक व शेख अकरम यांनी विचारना केली असता रज्जाक यांच्या अंगावर ट्रक्टर घालून जीवे मारण्याचा प्रयत्न करण्यात आला. येवढेच नव्हे तर पेट्रोल भरलेली कॅरीबॅग अंगावर टाकण्याचे प्रयत्न करत तिथे असलेले गुंड प्रकारचे लोक तोंडाला बांधून लाकडं दांडे हातात घेऊन आमच्या अंगावर काडी लावून जाळण्याचा प्रयत्न करत होते असा आरोप तक्रारीत करण्यात आला. याबाबत रितसर धारुर पोलिसांत तक्रार देण्यात आली मात्र धारुर पोलिसांनी सदर प्रकरण सिविल असल्यामुळे तक्रार घेण्यास टाळाटाळ केली. याबद्दल सय्यद रज्जाक व शेख अकरम यांनी जिल्हा पोलिस अधिक्षकांकडे दाद मागितली असून यात पोलिस अधिक्षक काय भुमिका घेणार याकडे लक्ष लागले आहे.

# पाटोदा तहसील कार्यालयात चोरट्याने मारला डल्ला



**पाटोदा । प्रतिनिधी**

येथील तहसील कार्यालयातून चोरट्याने चक्क संगणक लंपास केल्याची घटना घडली आहे. या प्रकरणी नायब तहसीलदारांच्या तक्रारीवरून पाटोदा पोलीस ठाण्यात अज्ञात चोरट्या विरोधात गुन्हा नोंदविण्यात आला आहे. चक्क तहसील कार्यालयातूनच ही चोरी झाल्याने सर्वत्र चर्चेचा विषय बनला आहे. सोबतच शासकीय कार्यालयही आता चोरट्यांपासून सुरक्षित नाहीत का? असा प्रश्न विचारला जाऊ लागला आहे. याबाबत पुढे आलेल्या माहितीनुसार, पाटोदा तहसील कार्यालयातील महसूल विभागातून संगणकाची चोरी झाली आहे. तहसील प्रशासनाने चोरीचा प्रकार उघड होऊ नये यासाठी प्रयत्न केला. मात्र ही बाब नायब तहसीलदार गणेश दहिफळे यांच्या लक्षात येताच त्यांनी ही तक्रार नोंदवली आहे. यात चोरट्याने हा संगणक लंपास का केला? की कार्यालयातूनच याची चोरी झाली. याचा तपास आता पोलीस करत आहेत. मात्र तहसील कार्यालयच असुरक्षित असल्याचा प्रत्यय या निमित्ताने समोर आला आहे.

## रवी बुट्टे यांचे निधन

दिंद्रुड येथील मुळ रहीवाशी असलेला बीड येथील तरूण रवी श्रीकांत बुट्टे याचे खाजगी रूग्णालयात उपचारा दरम्यान रविवारी दुपारी दीर्घ आजाराने निधन झाले. मृत्यूसमयी त्याचे वय ३४ वर्षाचे होते.

# नारायणगडचे अध्यात्मासह सामाजिक, शैक्षणिक कार्य मोलाचे : दशरथे महाराज

**बीड । प्रतिनिधी**

श्रीक्षेत्र नारायण गडचे अध्यात्म बरोबर सामाजिक व शैक्षणिक मोठे कार्य असल्याचे प्रतिपादन उमेश महाराज दशरथे यांनी केले. ते, नारायणगडच्या नारळी सप्ताह राक्षसभूवन येथे कीर्तन सेवेत बोलत होते. यावेळी महंत प्रेममूर्ती शिवाजी महाराज, उत्तराधिकारी संभाजी महाराज आदींसह महाराज मंडळी, वारकरी, भाविकांची मोठी उपस्थिती होती.

राक्षसभुवन येथे हजारो भाविकांच्या उपस्थितीत श्री क्षेत्र नारायण गडचा नारळी सप्ताह सुरू आहे. सप्ताहातील तिसरे कीर्तन पुष्प महाराष्ट्रातील नामवंत कीर्तनकार उमेश महाराज दशरथे



यांनी गुंफले. यावेळी बोलताना दशरथे महाराज मनाली की गेल्या तीनशे वर्षांपासून श्रीक्षेत्र नारायण गडचे महाराष्ट्राच्या अध्यात्मिक क्षेत्रात मोठे कार्य आहे. या कार्यामुळेच श्रीक्षेत्र नारायण गडची धाकटी पंढरी म्हणून किती आहे.

या अध्यात्मिक कार्यासोबतच श्रीक्षेत्र नारायण गडचे सामाजिक व शैक्षणिक क्षेत्रात मोलाचे कार्य आहे. यावेळी कीर्तनाचे पुष्प गुंफताना हनुमान जयंतीचे अवचित्य साधून त्यांनी कीर्तन केले. ज्याप्रमाणे हनुमंत रायाची श्री प्रभू रामचंद्र यांच्यावर निसिम भक्ती होती त्याचप्रमाणे आपणही देवाची भक्ती करण्याचे आवाहनही यावेळी उमेश महाराज दशरथे यांनी केले. या कीर्तनास बीड जिल्ह्याभरासह इतर ठिकाणहुनही दिलेल्या भाविकांची मोठी उपस्थिती होती.

श्रीक्षेत्र नारायणगड संस्थांच्या गादीची मोठी परंपरा आहे तसेच संस्था नाही महाराष्ट्रातील नामवंत संस्था आहे. असे असले तरी येथील महंत शिवाजी महाराज हे अत्यंत विनयशील व सभ्य असून गडाच्या भाविकांशी प्रेमाने संवाद साधतात. महंत शिवाजी महाराज हे अत्यंत साधी, सभ्य राहणीमान व विनयशीलतेचे विद्यापीठ असल्याचेही यावेळी कीर्तनात उमेश महाराज दशरथे म्हणाले.



*बीड: श्री युवा माहेश्वरी सेवाभावी संस्थेच्या वतिने श्री हनुमान जन्म उत्सव निमित्त बीड शहरातील विप्रनगर येथे संगीतमय सुंदरकांडचे आयोजन करण्यात आले होते. श्री. मनोजजी महाराज गौड यांच्या वाणीतुन संपन्न झालेल्या या सुंदरकांड कार्यक्रमाच बीड शहरातील भाविक भक्तांनी महाप्रसादाचा लाभ घेतला आणि उपस्थित मान्यवरांसह आरती करुन श्री हनुमंत रायनचे दर्शन घेतले.*

## जाहीर प्रगटन

# सावधान

झमझम इंडस्ट्रीज बीड ही आपल्या झमझम या थंडपेय उत्पादनाचा व्यवसाय करते. ही कंपनी थंडपेयाच्या रिकाम्या बाटल्या किंवा प्लास्टीक क्रेटची विक्री करत नाहीत. बाजारात अशा रिकाम्या बाटल्या खरेदी व विक्री करून त्याचा दुरुपयोग करून कंपनीस बदनाम करण्याचा प्रयत्न होत आहे. अशा प्रकारे रिकाम्या बाटल्या व क्रॅटची खरेदी व विक्री करणे हे कायदेशीर दृष्ट्या गैर आहे. 'झमझम'ची उत्पादनाची विक्री करणाऱ्या विक्रेत्यांनीही याची काळजी घेणे आवश्यक आहे. त्याचप्रमाणे जुने साहित्य (भंगार) खरेदी-विक्री करणाऱ्यांनीही झमझमच्या रिकाम्या बाटल्या अथवा क्रॅटची खरेदी विक्री करणाऱ्यांनीही झमझमच्या रिकाम्या बाटल्या अथवा क्रॅटची खरेदी- विक्री व्यवहार करू नये किंवा त्यास सहकार्य करू नये. असे कोठेही आढळल्यास झमझम इंडस्ट्रीज त्या विरुद्ध कायदेशीर कारवाई करील व त्याच्या परिणामाची जबाबदारी संबंधितावर राहील याची सूचना देण्यासाठीच हा सावधानतेचा इशारा दिला आहे. याची नोंद घ्यावी.

प्रगटन देणार
झमझम इंडस्ट्रीज
झमझम कॉलनी, बीड

# अपहरण झालेल्या मुलाची तासाभरात सुटका; बीड पोलिसांची वेगवान कारवाई

**बीड । प्रतिनिधी**

शहरातील पांगरी रोड परिसरात एका ९ वर्षीय शाळकरी मुलाचे अपहरण झाल्याने एकच खळबळ उडाली. मात्र अवघ्या एका तासात स्थानिक गुन्हे शाखेच्या कर्मचाऱ्यांनी अतिशय वेगाने तपास करत आरोपीला अटक केली आणि मुलाची सुखरूप सुटका केली.

ही घटना रविवारी सायंकाळी ६ च्या सुमारास घडली. आरोपी जगदीश गायकवाड (रा. अंबिका चौक) याने मुलाचे अपहरण करून



बीड बसस्थानकाच्या दिशेने पलायन केले होते. या घटनेची माहिती मिळताच स्थानिक गुन्हे शाखेतील कर्मचाऱ्यांनी तातडीने हालचाली सुरू केल्या. पोलिस कर्मचारी अशोक दुबाले आणि मुन्ना वाघ यांनी मिळालेल्या माहितीच्या आधारे बसस्थानक परिसरात सापळा रचून आरोपीला ताब्यात घेतले.

अपहरणकर्त्याने मुलाच्या वडिलांकडून ५ लाख रुपयांची खंडणी मागितल्याचेही समोर आले आहे. घटनेची गांभीर्यता ओळखून पोलीस अधीक्षकांनी स्वतः लक्ष घालून तात्काळ गुन्हा दाखल करण्याच्या सूचना शिवाजीनगर पोलीस ठाण्याला दिल्या.

सध्या आरोपी स्थानिक गुन्हे शाखेच्या ताब्यात असून, पुढील चौकशीसाठी त्याला शिवाजीनगर पोलिसांच्या ताब्यात दिले जाणार आहे. दुबाले आणि वाघ यांच्या वेळेवर आणि योग्य कृतीमुळे अपहरण झालेल्या मुलाला वेळेत सोडवता आले असून, त्यांच्या कार्याची सर्वत्र प्रशंसा होत आहे.

## जयभिम महोत्सवात नृत्य स्पर्धा

**बीड । प्रतिनिधी**

येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन येथे, जयभीम महोत्सवात नृत्य स्पर्धा पार पडली. या स्पर्धेला अतिशय चांगला प्रतिसाद मिळाला होता. बीड येथील सामाजिक न्याय भवन येथे डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३४ व्या जयंती निमित्ताने ४ ते १४ एप्रिल या कालावधीत जयभिम महोत्सव आयोजित करण्यात आला आहे. त्या अनुषंगाने या जयभिम महोत्सवात विविध स्पर्धा घेण्यात आल्या होत्या. त्यामध्ये नृत्य स्पर्धा उत्साहात पार पडली. यावेळी नृत्य स्पर्धा समितीचे प्रमुख तथा आयोजक अजय सवाई यांच्या उपस्थितीत सदरील स्पर्धा पार पडली. या नृत्य स्पर्धेला उदघाटक म्हणून शिक्षण विस्तार अधिकारी भगवान सोनवणे, प्रमुख पाहुणे प्रा. वसंत ओगले उपस्थिती होते.

CMYK
दैनिक मराठवाडा पत्र
● epaper.marathwadapatra.com
सोमवार, दि.१४ एप्रील २०२५ पान ४

## डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी तेव्हाच व्यक्त केली होती भीती: विजय साळवे



**माजलगाव । प्रतिनिधी**

विश्वरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३४ व्या जयंतीच्या पूर्वसंध्येला बाबासाहेब आंबेडकरांना अभिवादन करताना रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाचे बीड जिल्हा अध्यक्ष विजय साळवे यांनी सांगितले की डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांनी जेव्हा भारताचे संविधान मसुदा समितीचे अध्यक्ष या नात्याने तयार करून ते भारताचे राष्ट्रपती डॉक्टर राजेंद्र प्रसाद व प्रधानमंत्री पंडित जवाहरलाल नेहरू यांना व सर्व भारतीयांना सुपूर्त करताना अशी भीती व्यक्त केली होती की मी हे भारताचे संविधान ▶▶ उर्वरित पान २ वर



*राज्य मंत्री तथा परभणी जिल्हाच्या पालकमंत्री सौ.मेघना दिदी साकोरे (बोर्डीकर) याचा सत्कार करताना दैनिक मराठवाड़ा पत्र चे माजलगांव तालुका प्रतिनिधी संतोष रासवे*

# बीडमध्ये उसळणार भीमसागर!

## बीड पोलिसांचा राहणार तगडा बंदोबस्त; सार्वजनिक जयंती उत्सव समितीने दिली माहिती



### ● असा असणार पोलीस बंदोबस्त

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीसाठी पोलीस अधीक्षक नवनीत यांनी तगडा पोलीस बंदोबस्त ठेवला असून तब्बल १०५० पोलीस कर्मचारी तैनात असणार आहेत. त्यामध्ये ११५ पोलीस कर्मचारी, दंगल नियंत्रण पथक ६, राज्य राखीव दल पथक, ८५० होमगार्ड असा पोलीस बंदोबस्त असणार आहे.

### ● पांढरे वस्त्र परिधान करुन समाज होणार सहभागी!

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन करण्यासाठी आंबेडकरी जनता, बौद्ध उपासक- उपासिका पांढरे शुभ्र वस्त्र परिधान करून अभिवादन रॅलीसह जयंती मिरवणुकीत सहभागी होणार आहेत.

### ● या ठिकाणाहून निघणार अभिवादन रॅली, मिरवणूक

बीड शहरातील छत्रपती शिवाजी महाराज पुतळा येथून सकाळी आठ वाजता अभिवादन रॅली काढली जाणार आहे. ही अभिवादन रॅली, डॉ.बाबासाहेब आंबेडकर सार्वजनिक जयंती उत्सव समिती आणि भारतीय बौद्ध महासभा यांच्यासह शहरातील बौद्ध विहार कमिट्यांकडून काढली जाणार आहे.

**बीड । प्रतिनिधी**

भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची १३४ वी जयंती आज सोमवार (दि.१४) एप्रिल रोजी बीड शहरासह जिल्ह्यात मोठ्या उत्साहात पार पडणार आहे.त्या अनुषंगाने बीड शहरातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यास अभिवादन करण्यासाठी जनसागर लोटणार असून दिवसभर पोलिसांचा तगडा बंदोबस्त असणार आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती विश्वातल्या अनेक देशात साजरी केली जात असून बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३४ व्या जयंतीनिमित्त बीड शहरात ४ एप्रिल १४ एप्रिल या कालावधीत विविध कार्यक्रम डॉ.बाबासाहेब आंबेडकर सार्वजनिक जयंती उत्सव समितीकडून आयोजित करण्यात आले होते. त्या सर्व कार्यक्रमांना अतिशय उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला होता. डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन करण्यासाठी बीड शहरातील छत्रपती शिवाजी महाराज पुतळा येथून सोमवार (दि१४) एप्रिल रोजी ▶▶ उर्वरित पान २ वर

## थोडक्यात

### आमचा आजही सर्वांगिण विकास नाही; धम्मसंगिनी रमागोरख यांचे परखड मत



**बीड । प्रतिनिधी**

भारतीय संविधान जगात श्रेष्ठ असून प्रत्येक घटकाला त्यामुळे न्याय मिळाला आहे. एवढे महान कार्य घटनाकार डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी केले. परंतू संविधान राबविणाऱ्या यंत्रणेकडून आजही आमच्या आर्थिक सशक्तीकरणासाठी ठोस भूमिका घेतल्याचे दिसत नाही.त्यामुळे आमचा सर्वांगिण विकास झाला आहे असे म्हणता येणार नाही. असे परखड मत धम्मसंगिनी रमागोरख यांनी व्यक्त केले.

बीड शहरातील सामाजिक न्याय भवन येथे, दि.४ ते १४ एप्रिल रोजी या कालावधीत जयभीम महोत्सव आयोजित करण्यात आला आहे. त्या अनुषंगाने शनिवार रोजी ▶▶ उर्वरित पान २ वर

## हरिनाम सप्ताह सामाजिक एकतेचे संस्कार केंद्र : राजेंद्र मस्के

### ● बेलगाव येथे अखंड हरिनाम सप्ताहाची सांगता

**बीड । प्रतिनिधी**

प्रख्यात देवस्थान बेलेश्वर परिसरातील बेलगाव येथे बेलेश्वर संस्थान महंत महादेव महाराज यांच्या प्रमुख उपस्थितीत व हभप तुकाराम महाराज यांच्या

▶▶ उर्वरित पान २ वर



### स्व.सौ. सुरेखाताई क्षीरसागर यांच्या तृतीय पुण्यस्मरणानिमित्त पंचदिनात्मक कीर्तन महोत्सवाचे आयोजन

**नवगण राजुरी । प्रतिनिधी**

येथे स्व.सौ. सु रेखाताई रविंद्र क्षीरसागर यांच्या तृतीय पुण्यस्मरणानिमित्त दि.१६ ते २० एप्रिल या काळात पंचदिनात्मक किर्तन महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. स्व.सौ. सुरेखाताई रविंद्र क्षीरसागर यांनी अखंड स्वरूपी राम नामाचा जप करत आपले आयुष्य व्यतीत केले आहे. त्यांच्याच तृतीय पुण्यस्मरणानिमित्त या वर्षी मातृतीर्थ काकू-नाना नगर प्राथमिक आरोग्य केंद्राच्या शेजारी, नवगण राजुरी येथे आचार्य अमृताश्रम स्वामी महाराज यांच्या मार्गदर्शनाखाली पंचदिनात्मक कीर्तन महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. या कीर्तन महोत्सवात दैनिक कार्यक्रमात सायं. ५.०० ते ६.०० हरिपाठ, रात्री ९.०० ते ११.०० हरिकीर्तन होणार असून यात दि.१६ रोजी युवा कीर्तनकार सोपान महाराज कनेरकर, दि.१७ रोजी शिवचरित्रकार ह.भ.प. कबीर महाराज आत्तार (सातारा), दि.१८ रोजी ह.भ.प. विनोदाचार्य मधुकर महाराज सायाळकर (परभणी), दि.१९ रोजी ह.भ.प. गितांजलीताई झेंडे (पुरंदर) यांचे कीर्तन होणार आहे.

▶▶ उर्वरित पान २ वर

## मस्साजोग येथील नदीचे खोलीकरण डिझेल खर्च सह मोफत : ॲड अजित देशमुख यांचे नियंत्रण

**बीड । प्रतिनिधी**

मस्साजोग येथील नदीच्या खोलीकरणाच्या कामाची प्रगती होत आहे. नाम फाउंडेशन मार्फत हे काम पूर्णपणे विनामूल्य होत आहे. ॲड. देशमुख यांच्या विनंतीमुळे पोकलेन मशीनच्या खर्चासह डिझेलचा खर्च देखील नाम फाउंडेशन करत असल्याने स्व. संतोष देशमुख यांना खऱ्या अर्थाने ही श्रद्धांजली ठरत असल्याचे मत जन आंदोलनाचे विश्वस्त ॲड.



अजित देशमुख यांनी व्यक्त केले.

या कामावर ॲड. अजित देशमुख यांचे नियंत्रण असून त्यांनी या कामाला पुन्हा भेट दिली आहे. यावेळी त्यांच्या समवेत स्वर्गीय संतोष देशमुख यांचे बंधू धनंजय देशमुख हे देखील होते. धनंजय देशमुख हे दुःखातून सावरलेले नाहीत. त्यामुळे ते अन्य कोठेही जात नाहीत. मात्र आमच्या विनंतीला मान देऊन ते नदी ▶▶ उर्वरित पान २ वर

## शिवसेना सदस्य नोंदणी ला माजलगावात उत्स्फूर्त प्रतिसाद

**माजलगाव । प्रतिनिधी**

शिवसेना सदस्य नोंदणी माजलगाव तालुक्यातून उस्फूर्तपणे प्रतिसाद मिळत आहे. शिवसेना पक्षप्रमुख, उपमुख्यमंत्री एकनाथजी शिंदे व खासदार श्रीकांत शिंदे यांच्या आदेशानुसार, तसेच शिवसेना सचिव संजय मोरे, शिवसेना उपनेते व मराठवाडा संपर्कप्रमुख अर्जुनभाऊ खोतकर , आणि मराठवाडा विभागीय सचिव अशोक पटवर्धन बीड जिल्हा संपर्कप्रमुख बापूसाहेब मोरे शिवसेना जिल्हाप्रमुख अनिल दादा जगताप युवा सेनेचे मराठवाडा निरीक्षक बाजीराव चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली आणि शिवसेना धर्मवीर अध्यात्मिक सेनेचे बीड जिल्हा अध्यक्ष ह भ प



▶▶ उर्वरित पान २ वर

# झाडावरच टोमॅटो पिकुन गळु लागले भाव नसल्याने उत्पादन खर्चही निघेना

**लिंबागणेश । प्रतिनिधी**

उन्हाची तिव्रता वाढल्याने टोमॅटो पिकाला याची झळ बसल्याने झाडावरच टोमॅटो पिकुन गळु लागले आहेत. टोमॅटोचे दर घसरले असुन यातुन शेतातील खत, बियाणे, मजूरी याचा प्रचंड खर्च असुन टोमॅटो अवघ्या ५ ते १० रूपये किलो दराने विकावे लागत असुन उत्पादन खर्च देखील निघत नसल्याने शेतकरी आर्थिक संकटात सापडला असून शेतकऱ्यांमध्ये चिंतेचे वातावरण आहे.बाजारातील टोमॅटोची आवक वाढल्याने दरात घसरण झाल्याचे बोलले जाते. उत्पादन खर्चापेक्षाही कमी भाव मिळत असल्याने शेतकरी हवालदिल झाला असुन विक्रीला परवडत नसल्याने झाडावरच पिकुन गळत असल्याचे सांगत टोमॅटो बरोबरच कष्टही मातीमोल ठरल्याची उद्विग्न प्रतिक्रिया मुळुकवाडी येथील टोमॅटो उत्पादक शेतकरी अशोक मल्हारी ढास यांनी डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांच्याशी बोलताना दिली.



टोमॅटो बरोबरच कष्टही मातीमोल ; उत्पादन खर्चापेक्षा मिळतोय कमी भाव : अशोक ढास ( टोमॅटो उत्पादक शेतकरी मुळुकवाडी ता.जि.बीड) गेल्या वर्षी टोमॅटोला जवळपास १०० रूपये किलो भाव मिळाला होता. म्हणून टोमॅटोची लागवड केली. एकरी सव्वा लाख रुपयांपर्यंत खर्च आला. टोमॅटोचे पिक सुद्धा चांगले आले आहे.मात्र भाव नसल्यामुळे टोमॅटो विक्रीसाठी काढायला सुद्धा परवडत नाही. १०० रूपये कॅरेट भाव असुन चाकण,पुणे, नारायणगाव याठिकाणी विक्री साठी पाठवतोत.पण कॅरेट मागे वाहतुक खर्च ६० रूपये, टोमॅटो तोडण्यासाठी महिला मजूर ३०० रूपये रोज तसेच आडत, कमिशन आदी मिळुन ८०-९० रुपये खर्च येतो. म्हणून टोमॅटोची झाडावरच पिकुन गळती होत आहे. चांगला भाव मिळाला असता तर दैना फिटली असती परंतु आपलं नशीब फुटकं म्हणून सहन करायचं अशी मनातली सल अशोक ढास यांनी बोलून दाखवली.

## जयभीम महोत्सवात १८ तास वाचन उपक्रम: विद्यार्थ्यांनी नोंदविला उत्स्फूर्त प्रतिसाद



**बीड । प्रतिनिधी**

राज्याला आदर्श घालून दिलेल्या बीड जयभिम महोत्सवात १८ तास वाचन करुन डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन करण्यात आले. वाचन केल्याने मस्तक सुधारते आणि सुधारलेले मस्तक कोणापुढेही नतमस्तक होत नाही. त्यामुळे १८ तास वाचनाचा उपक्रम राबविण्यात आला असून विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

बीड शहरातील सामाजिक न्याय भवन येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३४ व्या जयंती निमित्ताने ४ ते १४ एप्रिल या कालवधीत जयभिम महोत्सव आयोजित करण्यात आला आहे. त्या अनुषंगाने गुरुवार (दि.११) एप्रिल रोजी तुलसी संगणक शास्त्र ▶▶ उर्वरित पान २ वर

